जा.क्र.का.15/वादत सन 2020-21/338
मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी तथा
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे कार्यालय,पुणे-1
दि.26/05/2020

**आदेश**

विषय :- सन 2020-21 या आर्थिक वर्षाकरीता वार्षिक दर तक्त्याबाबत...

संदर्भ :- 1) या विभागाचे शासनास पत्र क्र.वामुदत/2020-21/सहसंनर(मु)पु/320, दि.23/3/2020.

2) सहसचिव,महसूल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई यांचेकडील पत्र क्र.मुद्रांक-2020/24-03-2020/प्र.क्र.252/म-1 (धोरण), दि.30/3/2020.

3) या विभागाचा आदेश क्र.का.15/वादत सन 202021/321, दि.30/3/2020.

4) या विभागाचे शासनास पत्र क्र.वामुदत/2020-21/सहसंनर(मु)पु/330,दि.8/5/2020.

5) उपसचिव,महसूल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई यांचेकडील पत्र क्र.मुद्रांक-2020/27-03-2020/प्र.क्र.252/म-1 (धोरण), दि.26/05/2020.

ज्याअर्थी, महाराष्ट्र मुद्रांक (मालमत्तेचे वास्तव बाजारमूल्य निर्धारित करणे) नियम 1995 च्या नियम क्र.4 (3) अन्वये प्रतीवर्षी एप्रिल महिन्याच्या 1 तारखेस महाराष्ट्र राज्यातील सर्व भौगोलिक क्षेत्रासाठी स्थावर मालमत्तेचे वार्षिक दर तक्ते निर्गमित करण्यात येतात.;

आणि ज्याअर्थी, कोरोना विषाणू (Covid -19) संसर्गजन्य आजार फैलावण्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून शासनाने दि.18/3/2020 पासून नियंत्रित केलेली उपस्थिती व तद्नंतर जाहीर केलेल्या लॉकडाऊनच्या पार्श्वभूमीवर मर्यादीत कर्मचारी उपस्थित राहण्याचे निर्देश दिले असल्याने सन 2020-21 करिता वार्षिक दर तक्ता (ASR) उक्त नमूद नियमानुसार विहित केलेल्या दि.1 एप्रिल रोजी निर्गमित करण्यामध्ये अडचणी निर्माण झाल्यामुळे उक्त नियमामधील नियम क्र.4(9) नुसार शासन स्तरावरुन पुढील आदेश निर्गमित करणेबाबत या कार्यालयाने संदर्भित पत्र क्र.1 अन्वये शासनास विनंती केली होती;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र मुद्रांक (मालमत्तेचे वास्तव बाजारमूल्य निर्धारित करणे) नियम 1995 च्या नियम 4 च्या उप-नियम क्र.(9) मधील तरतूदी अन्वये शासनाने उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेऊन संदर्भित पत्र क्र.2 अन्वये दिलेल्या निर्देशानुसार या विभागाने संदर्भित क्र.3 च्या आदेशान्वये सन 2019-20 साठी अंमलात असलेले, वार्षिक दर तक्ते, मार्गदर्शक सूचना व नविन बांधकामाचे दर, दि.1 एप्रिल 2020 पासून ते दि.31 मे 2020 पर्यंत वा शासनाच्या पुढील निर्देशापर्यंत (यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत) संपूर्ण राज्यासाठी कायम ठेवणेत आले होते;

आणि ज्याअर्थी कोरोना विषाणू संसर्गजन्य आजार फैलावण्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून शासनाने लॉकडाऊनमध्ये वेळोवेळी केलेली वाढ व नियंत्रित केलेली उपस्थिती यामुळे दि.31 मे 2020 पर्यंत सन 2020-21 साठी वार्षिक मूल्य दर तक्ते, तयार करणेचे काम पूर्ण होऊ शकत नसलेने संदर्भित पत्र क्र.4 अन्वये शासनास सदर वार्षिक मूल्य दर तक्ते तयार करण्याचा कालावधी वाढविणेबाबत विनंती करणेत आली होती;



Scanned with CamScanner

आणि ज्याअर्थी या विभागाचे संदर्भित पत्र क्र.4 मधील विनंतीनुसार शासनाने संदर्भित पत्र क्र.5 अन्वये पुढीलप्रमाणे निर्देश दिले आहेत-

"सबब, सन 2020-21 करीता मागील वर्षाचा दर तक्ता आणि त्यासोबतच्या मूल्यांकनाच्या मार्गदर्शक सूचना दि.1 एप्रिल 2020 पासून शासनाच्या पुढील निर्देशापर्यंत कायम ठेवण्यात याव्यात."

त्याअर्थी आता शासनाचे संदर्भित क्र.5 चे निर्देश विचारात घेता मागील वर्षी (सन 2019-20 साठी) अंमलात असलेले वार्षिक दर तक्ते, मार्गदर्शक सूचना व नवीन बांधकामाचे दर दि.1 एप्रिल 2020 पासून शासनाच्या पुढील निर्देशापर्यंत संपूर्ण राज्यासाठी कायम ठेवणेत येत आहेत.

( ओमप्रकाश देशमुख )
**मुख्य नियंत्रक महसूली प्राधिकारी तथा**
**नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे**

प्रत माहितीसाठी सविनय सादर:-

1) मा.अपर मुख्य सचिव,महसूल,नोंदणी व मुद्रांक शुल्क विभाग,मंत्रालय,मुंबई-32.
2) मा.महालेखापाल,(लेखापरिक्षा)-II, नागपूर.

प्रत माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी.

3) अप्पर मुद्रांक नियंत्रक, मुंबई.
4) वरिष्ठ तांत्रिक संचालक, एन.आय.सी. पुणे.
5) सहसंचालक, नगर रचना, मूल्यांकन, महाराष्ट्र राज्य, पुणे माहिती व कार्यवाहीसाठी.
6) सहनोंदणी महानिरीक्षक, नोंदणी महानिरीक्षक कार्यालय, पुणे.
7) उपसंचालक, नगर रचना, मुंबई प्रदेश मूल्यांकन मुंबई.
8) सहायक संचालक, नगर रचना, मूल्यांकन, कोकण/पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.
9) नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक (मुख्यालय), पुणे.
10) नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक (संगणक), पुणे.
    सदर आदेश या विभागाच्या संकेतस्थळावर Upload करणेबाबतची कार्यवाही करणेत यावी.
11) नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, मुंबई / कोकण / पुणे / नाशिक/ औरंगाबाद / लातूर / अमरावती / नागपूर यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
    -/ सदर आदेशाबाबत आपले अधिनस्त सर्व नोंदणी कार्यालयांना तात्काळ अवगत करण्यात यावे. तसेच सदर आदेश त्यांना प्राप्त झाले असून, ते वाचलेबाबत (Read & Acknowledge) त्यांच्या कार्यालयाचा अहवाल प्राप्त करुन घेऊन या कार्यालयास पाठविणेत यावा.
12) सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय,मंत्रालय,मुंबई-32.
13) प्रशासकीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक,मुंबई शहर / मुंबई उपनगर जिल्हा.
14) सर्व मुद्रांक जिल्हाधिकारी / सह जिल्हा निबंधक.
    सह जिल्हा निबंधक यांनी आपल्या अधिनस्थ असलेल्या सर्व दुय्यम निबंधकांना सदर आदेशाबाबत तात्काळ अवगत करावे.

E:\technical\ASR 2019-20-ASR ORDER

Scanned with CamScanner